राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र,पुणे

# नवोपक्रम स्पर्धा सन 2021/22

प्राथमिक गट

# “ कोरोनाची महामारी,

# पालकांच्या सहकार्याने करू,

# इयत्ता पहिलीची वर्ग पूर्वतयारी ”

सादरीकरण

**नवोपक्रम कर्ता - श्रीमती राजश्री बाबुराव निर्वाणे**

जिल्हा परिषद शाळा आष्टा नं.17

केंद्र-आष्टा,ता.-वाळवा,जि.सांगली.

# वैयक्तिक माहिती



- स्पर्धकाचे नाव - श्रीमती राजश्री  बाबुराव निर्वाणे
- शाळेचे नाव -जिल्हा परिषद शाळा आष्टा नं.17
- केंद्र – आष्टा,ता.वाळवा, जि.-सांगली
- कायमचा पत्ता  -मु पो. दुधगाव,ता.-मिरज, जि.-सांगली
- जन्मतारीख- 28/02/1986
- शैक्षणिक अर्हता- एम.ए  डी.एड
- एकूण सेवा- 14 वर्षे
- नवोपक्रम शिर्षक- कोरोनाची महामारी, पालकांच्या सहकार्याने करू, इयत्ता पहिलीची वर्गपूर्वतयारी.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | नवोपक्रमाच्या पायऱ्या | पान क्र. |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावना | 5 |
| 2 | नवोपक्रमाची गरज व महत्त्व | 6 |
| 3 | नवोपक्रमाची उद्दिष्टे | 7 |
| 4 | नवोपक्रमाचे  नियोजन | 8-13 |
| 5 | नवोपक्रमाची कार्यपद्धती | 14-23 |
| 6 | नवोपक्रमाची नवीनता | 24 |
| 7 | उपक्रमाची यशस्विता | 25 |
| 8 | समारोप | 26 |
| 9 | संदर्भ ग्रंथ व परिशिष्टे | 27-32 |


**1) नवोपक्रमाचे शिर्षक :-**

“ कोरोनाची महामारी,

पालकांच्या सहकार्याने करू,

इयत्ता पहिलीची वर्ग पूर्वतयारी ”

- **<u>प्रस्तावना :-</u>**

जिल्हा परिषद शाळा आष्टा नं. 17 (चांदोली वसाहत) येथे माझ्याकडे 2021-22 मध्ये इयत्ता पहिलीचा वर्ग देण्यात आला. इयत्ता पहिलीचे वर्ष हे विद्यार्थ्यांकरिता खूप महत्त्वाचे असते. इयत्ता पहिली म्हणजे शिक्षणाची सुरुवात, शिक्षणाचा पाया होय. मूल जन्मल्यापासून ते सहाव्या वर्षापर्यंत त्याचे शरीर, मन व बुद्धी यामध्ये अतिशय वेगाने बदल घडून येत असतात. म्हणूनच, मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रयत्न करण्यासाठी ही सहा वर्षे अत्यंत महत्त्वाची असतात. या वयात मुलांना योग्य शैक्षणिक अनुभव दिले तर, त्यांचे शरीर, मन, बुद्धी यांच्या विकासाला हवी असलेली दिशा देणे शक्य होते. पण, कोरोना महामारीमुळे शाळांबरोबरच अंगणवाड्यादेखील बंद झाल्या. या काळात दाखलपात्र विद्यार्थ्यांच्या पूर्वप्राथमिक स्तरावरील क्षमता विकसित झाल्या असतील का ? असा प्रश्न माझ्या मनात घोळू लागला. मला पडलेल्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी सर्वप्रथम दाखलपात्र विद्यार्थ्यांच्या गृहभेटी घेण्याचे निश्चित केले. पालकांशी संवाद साधला. या संवादातून विद्यार्थ्यांच्या पूर्वप्राथमिक स्तरावरील क्षमता प्राप्त नसल्याचे निदर्शनास आले.

अंगणवाडी बंद असल्याने पूर्वप्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांचा अध्ययन क्षय (Learning Loss) झाला होता. हा अध्ययन क्षय भरून काढणे गरजेचे होते. कोरोनाची भयाण परिस्थिती पाहता, हा क्षय भरून काढणे एकट्या शिक्षकाला शक्य नाही. हेही लक्षात आले. यासाठी पालकांचे सहकार्य घेता येईल का ? याची चाचपणी केली. यावरही काही पालकांशी संवाद साधला. "मुलांच्या शिक्षणाला गती देण्यासाठी आम्ही तयार आहोत." असा सूर पालकांतून आला. पालकांच्या सहकार्याने मुलांना शैक्षणिक अनुभव दिले तर, नक्कीच मुलांमध्ये बदल घडून येईल व पूर्वप्राथमिक स्तरावरील भाषा व गणित विषयातील क्षमता,अध्ययन निष्पत्ती पूर्ण करून घेता येतील. असे वाटू लागले. यातूनच जिल्हा परिषद शाळा आष्टा नं.17 (चांदोली वसाहत) येथे हसत-खेळत कृतियुक्त शिक्षणावर भर देणारा " कोरोनाची महामारी, पालकांच्या सहकार्याने करू, इयत्ता पहिलीची वर्ग पूर्वतयारी" हा नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला.

## 2) **नवोपक्रम गरज :-**

इयत्ता पहिलीचा वर्ग म्हणजे विद्यार्थ्यांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचे पर्व. याच काळात विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा विकास होणे, पाया पक्का होणे गरजेचे असते. 'पाया पक्का असेल तर त्यावर उभी राहणारी इमारत ही पक्की भक्कम उभी राहते.' त्यामुळे इयत्ता पहिली दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे वर्ष खूप महत्त्वाचे असते. जिल्हा परिषद शाळा आष्टा नं. 17 (चांदोली वसाहत) येथे माझ्याकडे 2021-22 या शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिलीचा वर्ग देण्यात आला. येथील पालकवर्ग हा मोलमजुरी करणारा असल्याने, मुलांकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले. अशातच कोरोनाच्या महामारीमुळे सर्व अंगणवाड्या, शाळा बंद होत्या. इयत्ता पहिली दाखल होणारा विद्यार्थी हा अंगणवाडीत गेलाच नाही. त्यामुळे पूर्व प्राथमिक स्तरावरील क्षमता, अध्ययन निष्पत्ती त्याने प्राप्त केल्या की नाही ? याचा शोध गृहभेटीद्वारे घेणे आवश्यक वाटले. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्याचे निरीक्षण केले. पालकांशी संवाद साधला. यावेळी अनेक समस्या जाणवल्या. विद्यार्थ्यांना पूर्वप्राथमिक स्तरावरील अध्ययन क्षमता प्राप्त झाले नसल्याचे निदर्शनास आले. विद्यार्थ्यांचा हा 'क्षय' भरून काढणे गरजेचे वाटू लागले. यातूनच "कोरोनाची महामारी, पालकांच्या सहकार्याने करू, इयत्ता पहिलीची वर्ग पूर्वतयारी" हा उपक्रम राबविण्याचे निश्चित केले

**महत्व :-**

इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पूर्व प्राथमिक स्तरावरील अध्ययन क्षमता भरून काढण्यासाठी, "कोरोनाची महामारी, पालकांच्या सहकार्याने करू, इयत्ता पहिलीची वर्ग पूर्वतयारी" हा उपक्रम राबवणे महत्त्वाचे वाटले. हा उपक्रम राबविल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये अनेक बदल घडून येतील व याचा फायदा भाषा गणित विषयातील अध्ययन निष्पत्ती प्राप्त करण्यासाठी होईल.

या उपक्रमामुळे...

- विद्यार्थ्याच्या हस्त-नेत्र कौशल्याचा विकास होईल.
- विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी आवड निर्माण होईल.
- विद्यार्थ्यांच्या बैठक क्षमतेत वाढ होईल.
- विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल.
- विद्यार्थ्यांना स्व निर्मितीचा आनंद मिळेल.
- विद्यार्थ्यांच्या विविध कौशल्यांचा विकास होईल.

शिवाय विद्यार्थ्यांना पहिलीच्या वर्गात जुळवून घेणे सोपे जाईल. तसेच, वाचन-लेखन शिकणे सोपे होईल. यासाठी हा नवोपक्रम महत्त्वाचा आहे.

**3) नवोपक्रमाची उद्दिष्टे -**

1. ज्ञानेंद्रियांची क्षमता विकसित करणे.

2. सृजनशीलतेचा व कलात्मकतेचा विकास करणे.

3. निरीक्षण कौशल्याचा विकास करणे.

4. संभाषण कौशल्य विकसित करणे.

5.आत्मविश्वास व निर्णय क्षमता वाढविणे.

## 4) नवोपक्रमाचे नियोजन-

कोणत्याही कार्याची यशस्विता ही योग्य नियोजनावर अवलंबून असते. म्हणून माझ्या नवोपक्रमाचे नियोजन पुढील प्रमाणे केले....

### i) उपक्रम पूर्वस्थितीचे निरीक्षण -

उपक्रम पूर्वस्थिती चे निरीक्षण करत असताना असे आढळून आले की, मुले इयत्ता पहिलीत दाखल होण्यापूर्वी, त्यांचे पूर्वप्राथमिक शिक्षण हे अंगणवाडीत होत असते. पण, कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे अंगणवाड्या बंद झाल्या. ती अंगणवाडीत शिकू शकली नाहीत. त्यामुळे, ती वयानुरूप थेट इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेशित झाली आहेत. त्यामुळे, गृहभेटीद्वारे मुलांचे निरीक्षण केले. चाचणीद्वारे पालकांकडून माहिती घेतली. मिळालेल्या माहितीतून निष्कर्ष काढले. पूर्व प्राथमिक स्तरावरील अध्ययन क्षमता,अध्ययन निष्पत्ती विद्यार्थ्यांना प्राप्त झाल्या नसल्याचे निदर्शनास आले.

कोरोना परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांचा अध्ययन क्षय लर्निंग लॉस भरून काढण्यासाठी एखादा कृती कार्यक्रम हाती घेणे आवश्यक वाटले. पालकांच्या सहकार्याने आनंददायी, नाविन्यपूर्ण व कृतीयुक्त शिक्षण देऊन, विद्यार्थ्यांना कृतिशील करणारा, हसत-खेळत शिक्षण देणारा उपक्रम राबविण्याचे ठरवले.

### ii) संबंधित व्यक्तींची तज्ञांशी चर्चा -

नवोपक्रम राबविण्याचे निश्चित केल्यानंतर, यासंदर्भात मार्गदर्शन मिळणे खूप गरजेचे होते. यासाठी नवोपक्रमशील शिक्षक श्री. निलेश कांबळे यांच्याशी चर्चा केली. अहवाल लेखनासंदर्भात त्यांचे मार्गदर्शन घेतले. विद्यार्थ्यांचा पूर्व प्राथमिक स्तरावरील अध्ययन क्षय भरून काढण्यासाठी उपक्रम हाती घेतला असल्याने, याबाबत अंगणवाडी ताई, मदतनीस, पर्यवेक्षिका व पालक यांच्याशी चर्चा केली. डायटचे अधिकारी ज्येष्ठ अधिव्याख्याता श्री. भोई सर, आष्टा केंद्राच्या केंद्रप्रमुख पिरजादे मॅडम, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.यादव मॅडम व सहकारी शिक्षक यांचेही मार्गदर्शन घेतले. व नवोपक्रमास राबविण्यास सुरुवात केली

### iii) आवश्यक साधनांचा विचार -

#### अ) नवोपक्रमासाठी आवश्यक साधने -

नवोपक्रमांतर्गत राबविण्यात येणारे कृती उपक्रम पूर्ण करण्यासाठी विविध साधनांची आवश्यकता होती. सदरचा नवोपक्रम हा पालकांच्या सहकार्याने घरीच राबवायचा असल्याने, यासाठी आवश्यक असणारे साहित्य विद्यार्थ्यांना घर व परिसरात सहज उपलब्ध होईल अशाच प्रकारचे होते. प्राथमिक स्तरावरील कृती पूर्ण करण्यासाठी लागणारी विविध साधने ही सहज उपलब्ध होणारी अशीच होती. ती खालीलप्रमाणे आहेत.

- विविध डाळी, लसूण, शेंगा
- कागद,रुमाल, कापड
- खडे, चिंचोके
- बाटली, पाणी, वाळू, माती
- खेळणी, चेंडू
- रांगोळी, पीठ
- रंग
- मोबाईल इ.

**ब) उपक्रम मूल्यमापनासाठी आवश्यक साधने -**

- उपक्रम पूर्व चाचणी ( प्रश्नावली )
- उपक्रमोत्तर चाचणी ( प्रश्नावली )

वरील सर्व साधनांचा उपक्रमासाठी वापर करण्यात आला.

**iv) करावयाच्या कृतींचा क्रम-**

1. प्रथम गृहभेटीद्वारे विद्यार्थ्यांचे निरीक्षण केले. उपक्रम पूर्व चाचणी तयार केली.

2. उपक्रम पूर्व चाचणी पालकांकडून सोडवून घेतली.

3. उपक्रम पूर्व चाचणीद्वारे निष्कर्ष काढले.

4. पालकांशी उपक्रमासंदर्भात संवाद साधला.

5. पूर्व प्राथमिकस्तरावरील घ्यावयाच्या कृती निश्चित केल्या.

6. कृतींची अंमलबजावणी पालकांच्या सहकार्याने करून घेतली.

7. पालकांकडून उपक्रमोत्तर चाचणी सोडवून घेतली.

8. उपक्रमोत्तर चाचणीद्वारे निष्कर्ष काढले.

**v) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण-**

उपक्रमोत्तर चाचणीद्वारे आलेल्या निष्कर्षातून विद्यार्थ्यांमधील पुढील बदल दिसून आला.

- विविध उपक्रमांमुळे मुले आनंदी व उत्साही राहत आहेत. असे पालकांच्या निदर्शनास आले.
- उपक्रमामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.
- विविध कृतीमुळे मुलांच्या हस्त्र-नेत्र कौशल्याचा विकास झाला.
- विद्यार्थ्यांना शरीराचा तोल सांभाळता येऊ लागला.
- विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी आवड निर्माण झाली.
- या उपक्रमामुळे मुलांचा कृती व खेळातून शैक्षणिक विकास झालेला पाहून पालकांचा शाळा व शिक्षक यांच्या कडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला.
- पालक व विद्यार्थी संबंध अधिक दृढ झाले.

**vi) कार्यवाहीचे टप्पे वेळापत्रक -**

"कोरोनाची महामारी, पालकांच्या सहकार्याने करू, इयत्ता पहिलीची वर्ग पूर्वतयारी" हा नवोपक्रम, जिल्हा परिषद शाळा आष्टा नं.17 (चांदोली वसाहत) या शाळेत, शैक्षणिक वर्ष 2021- 22 मध्ये, इयत्ता पहिलीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या पूर्वप्राथमिक स्तरावरील अध्ययन क्षय भरून काढण्याकरता राबविण्यात आला.

या उपक्रमांमध्ये इयत्ता पहिली चे एकूण 18 विद्यार्थी सहभागी झाले होते. यासाठी खालील कृतींचा नवोपक्रमात समावेश करण्यात आला.

| अ.नं | कृतीचे नाव | दिनांक | सहभागी विद्यार्थी |
|---|---|---|---|
| 1 | पूर्व चाचणी | 8/06/2021 | 18 |
| 2 | डाळी निवडणे. | 15/06/2021 | 12 |
| 3 | लसूण सोलणे,शेंगा सोलणे. | 16/06/2021 | 12 |
| 4 | बाटलीचे टोपण काढणे/ लावणे, शर्टाची बटण काढणे /लावणे | 17/06/2021 | 12 |
| 5 | ओंजळीने पाणी धान्य भरणे. | 18/06/2021 | 14 |
| 6 | कागद,रुमाल,कापड इत्यादींच्या घड्या घालणे. | 19/06/2021 | 14 |
| 7 | कागद फाडून त्याचा चेंडू बनवणे. | 20/06/2021 | 18 |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | काढलेल्या आकारावर डाळी,बिया लावणे. | 21/06/2021 | 18 |
| 9 | भरलेला ग्लास घेऊन सरळ रेषेत/नागमोडी चालणे. | 22/06/2021 | 18 |
| 10 | चेंडू झेलणे, फेकणे,पकडणे. | 23/06/2021 | 18 |
| 11 | डोक्यावर वही/पुस्तक घेऊन चालणे. | 24/06/2021 | 18 |
| 12 | बोटांचे ठसे उमटविणे. भेंडी,कांदा,बटाटा ठसे उमटवणे. | 25/06/2021 | 18 |
| 13 | कापडाची वेणी घालणे. | 26/06/2021 | 18 |
| 14 | गोटया खेळणे/ लंगडी घालणे. | 27/06/2021 | 18 |
| 15 | खडे, चिंचोके घेऊन विविध रचना बनवणे. | 28/06/2021 | 18 |
| 16 | गादीवर कोलांट्या उड्या मारणे. | 29/06/2021 | 18 |
| 17 | स्पर्श ज्ञानाने वस्तू ओळखणे. | 30/06/2021 | 18 |
| 18 | डबीतील वस्तू आवाजावरून ओळखणे. | 1/07/2021 | 18 |
| 19 | विविध आकार ओळखता येणे. (गोल,त्रिकोण,चौकोन) | 2/07/2021 | 18 |
| 20 | धूळपाटीवर रेखाटन करणे | 3/07/2021 | 18 |
| 21 | मातीच्या विविध वस्तू बनविणे. | 4/07/2021 | 18 |
| 22 | स्व परिचय,मित्र परिचय,कुटुंब व आवडीबद्दल सांगणे. | 5/07/2021 | 18 |
| 23 | उत्तर चाचणी | 6/07/2021 | 18 |

अशाप्रकारे उपक्रमाचे नियोजन पूर्ण केले.

### vii) उपक्रमासाठी इतरांची मदत -

नवोपक्रम राबवत असताना विशेष मदत ही पालकांची झाली आहे. पालकांनी या कृती लक्षपूर्वक करून घेतल्यामुळे विद्यार्थ्यांचा अध्ययन क्षय भरून निघण्यास, पूर्व प्राथमिक स्तरावरील क्षमता विकसित होण्यास व अपेक्षित अध्ययन निष्पत्ती प्राप्त होण्यास मदत झाली. यावेळी काही विद्यार्थ्यांचे शेजा-याचीही मदत झाली आहे. तसेच, अंगणवाडी ताई,मदतनीस, अंगणवाडी पर्यवेक्षिका यांचेही सहकार्य लाभले सांगली डायचे जेष्ठ अधिव्याख्याता,शाळेच्या मुख्याध्यापिका, सहकारी शिक्षक यांचेही सहकार्य मिळाले. माझे पती श्री.संदीप पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**viii) उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे -**

सदर उपक्रम राबविल्याचे पुरावे खालीलप्रमाणे आहेत.

- सदर नवोपक्रमाचा व्हिडीओ Youtube वर प्रसारित केला आहे. त्याची लिंक खाली दिलेली आहे.

**https://youtu.be/Oq2uG5GvIjg**

- सदर नवोपक्रमाचे विद्यार्थी कृतीचे निवडक फोटो खालीलप्रमाणे...



ओंजळीने पाणी/धान्य भरणे.



डाळी निवडणे.



शर्टाचे बटण लावणे.



कागद/कापड/रुमाल घडी घालणे .



काढलेल्या आकारावर डाळी चिटकवणे.

## ५) नवोपक्रमाची कार्यपद्धती –

### i) पूर्वस्थितिची निरीक्षणे व त्याच्या नोंदी :-

उपक्रम राबवण्या अगोदर सर्व मुलांच्या घरी भेटी देऊन, मुलांचे निरीक्षण करण्यात आले. तसेच, पालकांशी संवाद साधून, काही बाबी जाणून घेण्यासाठी त्यांच्याकडून प्रश्नावली सोडवून घेण्यात आली.

1. मुलांमध्ये एकाग्रता कमी असल्याचे जाणवले.

2. पूर्व प्राथमिक स्तरावरील अध्ययन निष्पत्ती प्राप्त नसल्याचे जाणवले.

3. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास कमी वाटला.

4. विद्यार्थ्यांना शैक्षणिक वातावरण लाभले नसल्याचे जाणवले.

गृहभेटीच्या नोंदी ठेवण्यात आल्या आहेत.

### ii) उपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही :-

"कोरोनाची महामारी, पालकांच्या सहकार्याने करू, इयत्ता पहिलीची वर्गपूर्वतयारी" हा उपक्रम जिल्हा परिषद शाळा आष्टा नं.17 (चांदोली वसाहत) येथे इयत्ता पहिलीच्या वर्गासाठी राबविण्यात आला. इयत्ता पहिलीचा पट 18 आहे. सर्वच विद्यार्थ्यांनी उपक्रमात सहभाग नोंदविला. प्रथम उपक्रमाविषयी पालकांशी चर्चा करण्यात आली. पालकांना कृती कशा घ्यायच्या आहेत? हे समजावून सांगण्यात आले. दररोज व्हाट्सअप समूहावर करावयाच्या कृतींबाबत माहिती लिहिलेला फोटो टाकला जायचा. त्यामध्ये कोणती कृती घ्यायची? त्याची अध्ययन निष्पत्ती कोणती? व कृती कशी घ्यायची ? या सविस्तर सूचना देण्यात आल्या. त्यामुळे पालकांना ही कृती घेणे सोपे झाले. ज्या पालकांकडे मोबाईल नाहीत, त्यांना सर्व कृतींचा एक कागद गृहभेटीद्वारे पोहोच करण्यात आला व कृती कशा घ्यायच्या ? हे सांगण्यात आले. त्यामुळे पालकांनीही मुलांकडून कृती करून घेऊन, त्याचे फोटो, व्हिडीओ इतरांच्या मोबाईलवरून पाठविले. त्यामुळे सर्व मुले उपक्रमात सहभागी झाली.

- ❖ सदर उपक्रमामध्ये खालील कृतींचा समावेश करण्यात आला.

कृती क्रमांक 1 :- डाळी निवडणे.

अध्ययन निष्पत्ती - धान्य, कडधान्य निवडणे.

पालकांसाठी सुचना - या कृतीमध्ये मुलांना विविध डाळी एकत्र करून द्याव्यात किमान तीन-चार डाळी एकत्रित केलेल्या असाव्यात. त्यातून प्रत्येक डाळ वेगळी करण्यास सांगावी.

त्यामुळे विद्यार्थ्यांची एका जागी बसण्याची क्षमता वाढीस लागेल.

कृती क्रमांक 2 :- लसूण सोलणे / शेंगा सोलणे.

अध्ययन निष्पत्ती - लसूण सोलणे, शेंगा सोलून दाणे काढणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांना लसुण,शेंगा इ. वस्तू सोलण्यास द्याव्यात घरात उपलब्ध असतील तर केळ किंवा डाळिंब यांच्या साली मुलांना काढण्यास लावाव्यात.

या कृती मुलांनी प्रत्यक्ष केल्याने, मुलांची निरीक्षण क्षमता वाढते.

कृती क्रमांक 3 :- बाटलीचे टोपण / शर्टाचे बटण लावणे/काढणे.

अध्ययन निष्पत्ती - विविध प्रकारच्या बाटल्यांची टोपणे / शर्टाची बटणे सफाईदारपणे काढणे व लावणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांना बाटली देऊन, त्याचे टोपण लावणे,काढणे तसेच, एखादा शर्ट देऊन त्याची बटणे काढण्यास सांगून पुन्हा लावण्यास सांगावीत. ही कृती सरळ व उलट दिशेने करून घ्यावी.

यामुळे मुले समस्या सोडवण्यास सक्षम होतात.

कृती क्रमांक 4 :- ओंजळीने पाणी/धान्य भरणे.

अध्ययन निष्पत्ती - अचूकपणे बाटलीत साहित्य भरणे व ओतणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांना बाटलीमध्ये किंवा ग्लास मध्ये ओंजळीने पाणी,धान्य,वाळू,माती भरणेस द्यावे. ओतण्यास द्यावे.

या कृतीमुळे निरीक्षण क्षमतेत वाढ होते.

कृती क्रमांक 5 :- रुमाल,कागद,कापड इत्यादीच्या घड्या घालणे.

अध्ययन निष्पत्ती - घडी कामातून वस्तू तयार होतील अशा अवघड व अचूक घड्या घालणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांना घरातील उपलब्ध साहित्य उदा. रुमाल ,कागद, कापड इत्यादी देऊन त्यांच्या घड्या घालण्यास प्रवृत्त करावे.

यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सुव्यवस्थितपणा, नीटनेटकेपणा चे मूल्य रुजणार आहे. त्याचबरोबर, हस्त-नेत्र समन्वय साधता येणार आहे.

कृती क्रमांक 6 :- कागद फाडून त्याचा चेंडू बनविणे.

अध्ययन निष्पत्ती - तीन बोटांचा वापर करून कागद फाडता येणे, सरळ रेषेत कागद फाडणे, दोन्ही हातांचा वापर करून चेंडू बनवणे, एका हाताचा वापर करून चेंडू बनवणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांना कागद देऊन तो कागद प्रथम तीन बोटांनी फाडण्यास सांगणे. नंतर सरळ रेषेत फाडण्यास सांगणे. दोन्ही हातांचा वापर करून त्याचा चेंडू बनवण्यास सांगणे त्यानंतर एका हाताचा वापर करून चेंडू बनवण्यास सांगणे.

यामुळे विद्यार्थ्यामध्ये जिज्ञासूवृत्ती वाढीस लागते.

कृती क्रमांक 7 :- काढलेल्या आकारावर डाळी,बिया लावणे.

अध्ययन निष्पत्ती - आकारावर बिया, डाळी, वस्तू इत्यादी मांडणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांना विविध आकार काढून द्यावेत. उदा.एखादे फुल, गोल ,चौकोन, त्रिकोण इ. त्या आकारावर बिया, डाळी मांडण्यास सांगाव्यात.  जमिनीवर, फरशीवर ही कृती करून घ्यावी.

यामुळे मुलांना आनंद मिळणार आहे. कलेविषयी आवड निर्माण होणार आहे.

कृती क्रमांक 8 :- भरलेला ग्लास घेऊन सरळ रेषेत /नागमोडी चालणे.

अध्ययन निष्पत्ती - सरळ रेषेत, नागमोडी चालणे, ग्लास पाण्याने पूर्ण भरून घेऊन चालणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांना पाण्याने भरलेला ग्लास देऊन, थोडे अंतर सरळ रेषेत चालण्यास सांगणे. त्यानंतर, थोडे अंतर नागमोडी चालण्यास सांगणे.

यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल निर्मिती होते. कृतीतून मुलांना आनंदही मिळतो.

कृती क्रमांक 9 :- चेंडू झेलणे,फेकणे,पकडणे.

अध्ययन निष्पत्ती - छोटा चेंडू टप्प्याने किंवा उंच उडालेला झेलणे. एका हाताने चेंडू फेकणे दोन्ही हातानी झेलणे. ठराविक वस्तूवर नेम धरून चेंडू फेकणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांना घरात उपलब्ध असलेला चेंडू देऊन टप्प्याने, उंच उडालेला झेलण्यास सांगणे. तसेच, ठराविक अंतरावर वस्तू ठेवून त्यावर नेम धरून चेंडू फेकण्यास सांगणे.

या कृतीतून मुलांना खेळाचे कौशल्य आत्मसात होते.

कृती क्रमांक 10 :- डोक्यावर वही/पुस्तक घेऊन चालणे.

अध्ययन निष्पत्ती - उलटे चालणे,अडथळे ओलांडून,डोक्यावर वस्तू ठेवून चालणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांना डोक्यावर वही पुस्तक ठेवून उलट दिशेने चालण्यास सांगावे. तसेच, मध्ये काही वस्तू ठेवून अडथळे पार करत चालण्यास सांगावे.

या कृतीमुळे मुलांना शरीराचा समतोल साधण्यास मदत होते.

कृती क्रमांक 11 :- बोटांचे ठसे उमटविणे, भेंडी,कांदा,बटाटा ठसे उमटविणे.

अध्ययन निष्पत्ती - भेंडी,बटाटा,कांदा इत्यादी च्या ठशांतून कल्पनेने सौंदर्याकृती तयार करणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीत मुलांना एक कोरा कागद देऊन, त्यावर हाताचे बोटाचे ठसे उमटवणे. या कृतीसाठी एखाद्या डिशमध्ये गुलाल,कुंकू किंवा एखादा कलर देऊन त्यामध्ये थोडे पाणी घालून एकत्र करून द्यावे. तसेच घरामध्ये उपलब्ध असलेल्या कांदा,बटाटा,भेंडी यांचे सुद्धा ठसे उमटवून मुलांच्या कल्पनेने रचना तयार करून घ्यावी.

या कृतीमुळे मुलांमध्ये कला कौशल्य विकसित होणार आहे.

कृती क्रमांक 12 :- कापडाची वेणी घालणे.

अध्ययन निष्पत्ती - दोन्ही हातांचा वापर करून कापडाची वेणी घालणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांना घरातील कापड, साडीचा तुकडा देऊन,त्याची वेणी घालण्यास लावणे. पालकांनी प्रथम मुलांना कृती करून दाखवावी.

या कृतीमुळे विद्यार्थ्यांच्या सूक्ष्म स्नायूंचा विकास होणार आहे.

कृती क्रमांक 13 :- गोट्या खेळणे /लंगडी घालणे.

अध्ययन निष्पत्ती - गोट्यांचा खेळ खेळणे,लंगडी घालणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीत मुलांना गोट्या खेळण्यासाठी देणे. मुलांच्या कलेने त्यांना खेळण्यास प्रवृत्त करणे. लंगडी घालायला लावणे.

त्यामुळे मुलांमध्ये कौशल्य विकास होणार आहे. तसेच, खेळातून आनंद निर्मितीही होणार आहे.

कृती क्रमांक 14 :- खडे,चिंचोके घेऊन विविध रचना बनविणे.

अध्ययन निष्पत्ती - कल्पनाशक्ती वापरून रचना करणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीत मुलांना खडे, चिंचोके देऊन, त्यापासून विविध रचना बनविण्यास सांगणे. विद्यार्थ्यांना जमेल ती रचना करण्यास प्रवृत्त करणे. ही कृती जमिनीवर फरशीवर करून घ्यावी.

या कृतीमुळे विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळणार आहे.

कृती क्रमांक 15 :- गादीवर कोलांट्या उड्या मारणे.

अध्ययन निष्पत्ती - विविध प्रकारच्या उड्या मारणे, गादीवर कोलांट्या उड्या मारणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांना गादीवर अथवा कापड किंवा सतरंजीवर कोलांट्या उड्या मारायला लावणे.तसेच, एका पायावर जागेवर उड्या मारायला लावणे.

या कृतीमुळे मुलांच्या स्थूल स्नायूंचा विकास होणार आहे.

कृती क्रमांक 16 :- स्पर्श ज्ञानाने वस्तू ओळखणे.

अध्ययन निष्पत्ती - स्पर्शाने विविध वस्तू ओळखणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांचे डोळे रुमालाने बांधायचे आणि घरातील उपलब्ध वस्तू उदाहरणार्थ कांदा,बटाटा,वही ,मिरची, पट्टी, पेन इत्यादी वस्तूंना मुलांना फक्त स्पर्श करायला सांगून वस्तू ओळखायला लावावी.

या कृतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल निर्मिती होणार आहे

कृती क्रमांक 17 :- डबीतील वस्तू आवाजावरून ओळखणे.

अध्ययन निष्पत्ती - श्रवण /आवाज ओळखणे आवाजातील साम्य/भेद ओळखणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये विविध प्रकारच्या वस्तू ,पदार्थ उदा. खडे, शेंगदाणे, मोहरी, डाळी इ. वस्तू घ्यावी. एक छोटी डबी घेऊन, त्या विद्यार्थ्याला दाखवून एक एक वस्तू टाकून हलवावी. त्याचे आवाज ऐकवावे. ते आवाज लक्षात ठेवण्यास सांगावे. नंतर त्याला वस्तू न दाखवता, ती वस्तू डबीत ठेवा. डबी वाजवून आवाजावरून वस्तू ओळखण्यास सांगा.

या कृतीमुळे मुलांच्या श्रवण क्षमतेचा विकास होणार आहे.

कृती क्रमांक 18 :- विविध आकार ओळखता येणे. (गोल ,त्रिकोण, चौकोन)

अध्ययन निष्पत्ती - आकार दाखविल्यावर नाव सांगता येणे. परिसरातील त्रिकोण, चौकोन, गोल हे आकार दाखवता येणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांना घरातील परिसरातील गोल त्रिकोणी-चौकोनी आकारांच्या विविध वस्तू निरीक्षणास व हाताळण्यास द्यावी. आकारांची ओळख करून द्यावी.

या कृतीमुळे विद्यार्थ्यांना गोल, त्रिकोण, चौकोन या आकारांची ओळख होणार आहे.

कृती क्रमांक 19 :- धूळपाटीवर रेखाटन करणे.

अध्ययन निष्पत्ती - माती, वाळू, रांगोळी यात रेघोट्या मारणे, आकार काढणे. स्वतःच्या मनाने चित्र काढणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांना ताटामध्ये माती,वाळू,रांगोळी किंवा पीठ देऊन त्यामध्ये रेघोट्या मारण्यास लावावे. विविध आकार काढण्यास सांगा. मुलांच्या कल्पनेने एखादे चित्र काढण्यास सांगा.

या कृतीमुळे मुलांना विविध आकार रेखाटता येणार आहेत.

कृती क्रमांक 20 :- मातीच्या विविध वस्तू बनविणे.

अध्ययन निष्पत्ती - माती मळणे, मातीच्या साध्या वस्तू तयार करणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांना माती, पाणी देऊन ती मळण्यास सांगा. तसेच, मुलांच्या कल्पनेने साध्या वस्तू तयार करून घ्या.

या कृतीमुळे मुलांना नवनिर्मितीचा आनंद मिळणार आहे.

कृती क्रमांक 21 :- स्व-परिचय मित्र परिचय कुटुंब व आवडीबद्दल सांगणे.

अध्ययन निष्पत्ती – स्व-परिचय मित्र परिचय कुटुंब व आवडीबद्दल सांगणे.

पालकांसाठी सूचना - या कृतीमध्ये मुलांना स्वतःचा परिचय यामध्ये स्वतःचे नाव,तालुका,जिल्हा,देश तसेच, मित्र परिचय यामध्ये मित्रांची नावे, कुटुंबातील व्यक्तींची नावे, स्वतःच्या आवडीबद्दल सांगण्यास प्रवृत्त करा.

यामुळे मुले बोलण्यास उद्युक्त होतात. तसेच, संवाद कौशल्य विकसित होते. सामाजिकीकरण घडून येते.

अशाप्रकारे " कोरोनाची महामारी, पालकांच्या सहकार्याने करू, इयत्ता पहिलीची वर्ग पूर्वतयारी" या उपक्रमांमध्ये वरील एकवीस कृतींचा समावेश करण्यात आला. या कृतीतून मुलांमध्ये बरेच बदल घडून आले. पूर्व प्राथमिक स्तरावरील मुलांचा अध्ययन क्षय (लर्निंग लॉस) भरून काढण्यासाठी या कृती राबविण्यात आल्या. यामुळे मुले प्राथमिक स्तरावरील अध्ययन निष्पत्ती प्राप्त करण्यास सक्षम झाली.

**iii) कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन :-**

1. हा उपक्रम राबवताना सुरुवातीला पालकांकडून अल्प प्रतिसाद मिळाला. हळूहळू हा प्रतिसाद वाढू लागला.

2. विद्यार्थ्यांना कृती करायला आवडू लागल्या.

3. विद्यार्थी कृतीत आनंदाने सहभागी होऊ लागले.

4. सर्व कृतींचे व्हिडिओ व फोटो संकलन केले आहे.

**iv) उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्याच्या नोंदी :-**

- मुलांचे विविध उपक्रम घेतल्यामुळे मुलांमध्ये नवनवीन गोष्टी शिकण्याची उत्सुकता निर्माण झाली.
- डाळी निवडणे,लसूण सोलणे,शेंगा फोडणे, उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढीस लागली.
- बाटलीचे टोपण /शर्टाचे बटण लावणे/ काढणे यामुळे मुले एखादी समस्या सोडविण्यास सक्षम झाली.
- कागद, रुमाल यांच्या घड्या घालण्याच्या कृतीमुळे मुलांना हस्त-नेत्र समन्वय साधता येऊ लागला.
- काढलेल्या आकारावर डाळी,बिया ठेवल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षण कौशल्याचा विकास झाला.
- भरलेला ग्लास घेऊन एका सरळ रेषेत व नागमोडी चालणे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तोल सांभाळण्याचे कौशल्य विकसित झाले.
- ठसे कामातून मुलांना नवनिर्मितीचा आनंद मिळाला.
- त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळाला. तसेच, वस्तूचे विभाजन कसे करावे? हे समजले.
- खेळामुळे शरीराचा समतोल साधता येऊ लागला.
- अशाप्रकारे, विविध उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या पूर्व प्राथमिक स्तरावरील भाषिक व गणितीय अध्ययन निष्पत्ती पूर्ण होत असल्याचे निदर्शनास आले.

**v) कार्यवाहीत आलेल्या अडचणी :-**

उपक्रम राबवत असताना काही समस्या अडचणी जाणवल्या. त्या खालीलप्रमाणे...

- हा उपक्रम ऑनलाईन पद्धतीने व पालकांच्या सहकार्याने राबवायचा होता.पण, सर्व पालकांकडे अँड्रॉइड मोबाईल नव्हते. फोटो व्हिडिओ पाठवल्यात पालकांना अडचण येऊ लागली. यावर उपाय म्हणून शेजारील ताई-दादा, गल्लीमित्र यांची मदत घेतली.

- विद्यार्थ्यांचे पालकव मजुरी करणारे असल्याने, त्यांची भेट होण्यास अडचणी होत्या. पालकांच्या सुट्टीदिवशी त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला व उपक्रमातील सहभाग वाढविला.
- प्रथम पालक वर्गाचा अल्प प्रतिसाद होता. पण, वर्गातील काही मुले आनंदाने कृती करत आहेत. 'व्हाट्सअप' ला पाठवत आहेत. हे पाहून हळूहळू सर्व मुलांचा उपक्रमातील सहभाग वाढला.

### vi) माहितीचे विश्लेषण :-

सदर नवोपक्रमाची अंमलबजावणी करण्यापूर्वी पालकांसाठी प्रश्नावली तयार केली. ही प्रश्नावली त्यांच्याकडून खालील पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणी म्हणून सोडवून घेतली.

1. कोरोना कालावधीत मुलांना ऑनलाईन/ऑफलाइन शिक्षण मिळाले आहे का? **होय/नाही.**

2. कोरोना कालावधीत तुम्ही मुलांचा घरी अभ्यास घेत आहात का? **होय/नाही.**

3. तुम्ही मुलांकडून डाळी निवडणे,शेंगा/लसुण सोलणे यासारख्या कृती करून घेतल्या आहेत का ? **होय/नाही.**

4. तुम्ही मुलांना आकाराची ओळख करून दिली आहे का ? **होय/नाही.**

5. तुम्ही मुलांकडून पाटीवर, जमिनीवर रेखाटन करून घेतले आहे का? **होय/नाही.**

6. तुम्ही मुलांकडून ठसेकाम, माती काम करून घेतले आहे का? **होय/नाही.**


7. तुम्ही मुलांना सरळ रेषेत /नागमोडी चालण्यास लावले आहे का? **होय/नाही.**

8. तुम्ही मुलांना स्पर्शाने कोणती वस्तू ओळखायला सांगितली आहे का? **होय/नाही.**

9. तुम्ही मुलांना आवाजावरून कोणती वस्तू ओळखायला सांगितली आहे का? **होय/नाही.**

10. मुले स्वतः विषयी माहिती सांगतात का? **होय/नाही.**

चाचणीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण खालील प्रमाणे आहे.




**निष्कर्ष –**

1. इयत्ता पहिलीतील 18 विद्यार्थ्यांना उपक्रमपूर्व कोरोना कालावधीत ऑनलाईन अथवा ऑफलाइन शिक्षण मिळाले नसल्याचे, वरील आलेखावरून लक्षात येते. याचाच अर्थ या विद्यार्थ्यांच्या पूर्वप्राथमिक स्तरावरील क्षमता विकसित झाल्या नसल्याचे दिसून येते.
2. उपक्रमपूर्व कोरोना कालावधीत केवळ 22% विद्यार्थ्यांचे पालक अभ्यास घेतअसल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच, 78% विद्यार्थ्यांचा 'अध्ययनक्षय' झाल्याचे दिसून येते.
3. कोरोना महामारीत विद्यार्थांच्या पूर्वप्राथमिक स्तरावरील क्षमता व अध्ययन निष्पत्ती पूर्ण करण्यासंदर्भात फारच कमी प्रयत्न झाल्याचे दिसून येते. परंतु, नवोपक्रम कालावधीत यात अमुलाग्र प्रयत्न झाल्याचे निदर्शनास येते.

**6) उपक्रमाची नवीनता :-**

- सदरचा उपक्रम हा इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांच्या वर्गपूर्वतयारीसाठी अत्यंत उपयुक्त आहे
- सदरचा उपक्रम विद्यार्थी हसत-खेळत कोणत्याही दडपणाखाली न येता, पालकांच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करतात.
- विद्यार्थ्यांना शाळेविषयी, शिक्षणाविषयी आवड निर्माण होते.
- इतर शिक्षकांनाही वर्गपूर्वतयारीसाठी कोणत्या कृती घ्याव्यात ? हे लक्षात आले.
- विद्यार्थ्यांच्या अवयवात सुसुत्रता साधून एकाग्रता वाढीस लागते.
- पालकांमुळे विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन मिळते.
- कृतींमुळे अक्षर, अंक लेखनाकडे आकृष्ठ होतात.
- शिक्षक-पालक व पालक-विद्यार्थी संबंध अधिक दृढ होतात.
- विद्यार्थ्यांच्या अध्ययनात पालकांचा कृतीयुक्त सहभाग वाढतो.

## 7 ) नवोपक्रमाची यशस्विता/ फलनिष्पत्ती -

“ कोरोनाची महामारी ,पालकांच्या सहकार्याने करू, इयत्ता पहिलीची वर्गपूर्वतयारी” नवोपक्रम राबविले नंतर मुलांमध्ये बरेच बदल घडून आले. तसेच, हा उपक्रम इयत्ता पहिलीच्या वर्गाकरिता मुलांची वर्गपूर्वतयारी करून घेण्यासाठी खूप उपयुक्त असा आहे.

1. ज्ञानेंद्रियांची क्षमता विकसित झाली.

2. सृजनशीलतेचा व कलात्मकतेचा विकास झाला.

3. विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षण कौशल्याचा विकास झाला.

4. संभाषण कौशल्याचा विकास झाला.

5. आत्मविश्वास व निर्णय क्षमतेत वाढ झाली.

6. विद्यार्थ्यांचा अध्ययन क्षय भरुन निघण्यास मदत झाली.

7. सदर उपक्रमातील कृती आष्टा केंद्राच्या समूहावर प्रसारित करण्यात आल्या. या कृती काही शाळांतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून करून घेतल्या. हे या नवोपक्रमाचे फलित म्हणता येईल.

8. सदर उपक्रम पालकांनाही खूप आवडला. पालकांनीही उस्फूर्तपणे सर्व कृती मुलांकडून करून घेतल्या व मुलांना वर्ग पूर्वतयारीसाठी प्रेरित केले.

9. या उपक्रमामुळे मुलांमध्ये स्थिरता, एकाग्रता ,कौशल्यविकास ,निर्णय क्षमता, जिज्ञासा वाढ, बैठक क्षमता, स्वयंअध्ययन, कृतियुक्त शिक्षण या सर्व गोष्टींचा विकास झाला व मुले वाचन-लेखन कौशल्य आत्मसात करण्यास प्रेरित झाली.

## 8) समारोप -

माझ्या जिल्हा परिषद शाळा आष्टा नं. 17 (चांदोली वसाहत) शाळेतील इयत्ता पहिलीत नव्याने दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची वर्गपूर्वतयारी कोरोनाच्या काळात चांगल्याप्रकारे व्हावी. विद्यार्थी शाळेत नसले तरी, घरी राहून 'शाळा बंद पण, शिक्षण सुरू' याप्रमाणे पालकांच्या सहकार्याने त्यांची वर्गपूर्व तयारी व्हावी. विद्यार्थ्यांना शाळेविषयी गोडी निर्माण व्हावी. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास कुतूहल निर्मिती व्हावी. मुलांमध्ये जिज्ञासू वृत्ती वाढावी. यासाठी "कोरोनाची महामारी, पालकांच्या सहकार्याने करू, इयत्ता पहिलीची वर्गपूर्वतयारी" हा उपक्रम घेण्यात आला. माझ्या या उपक्रमांमध्ये सहकार्य करणाऱ्या, मला प्रेरणा देणाऱ्या, सर्वांची मी ऋणी आहे.

वाळवा पंचायत समिती, इस्लामपूरचे गटशिक्षणाधिकारी मा. कुडाळकर साहेब, शिक्षणविस्ताराधिकारी सौ.माळी मॅडम, श्री.आंबी साहेब व कु.रांजणे मॅडम, आष्टा केंद्राच्या केंद्रप्रमुख पिरजादे मॅडम तसेच,शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.यादव मॅडम व इतर सहकारी शिक्षक यांची मी ऋणी आहे. माझे पती श्री.संदीप पाटील यांची प्रेरणा माझ्यासाठी खूप महत्त्वाची होती.

त्याचप्रमाणे, या उपक्रमात सहभागी असणारे माझे बालचमू म्हणजे माझे विद्यार्थी आणि माझा पालकवर्ग या सर्वांची मी मनापासून आभारी आहे.

## 9) संदर्भसूची व परिशिष्टे –

### i) संदर्भसूची –

1. बालशिक्षण क्रम आकार पुस्तिका (संपादक व प्रकाशक- गोविंद नांदेडे)

2. बाल शिक्षण व कार्य पद्धती आणि उपक्रम (महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद)

3. दिशा नवोपक्रमाची (म. रा. शै.सं. व प्र. प.पुणे)

4. शालेय उपक्रम ( म. रा.शै.सं.व प्र.प.पुणे)

5. शैक्षणिक नवोपक्रम (श्री.एस.आर.माशाळे)

### ii ) परिशिष्टे -

- पालकांसाठी पूर्वचाचणी व उत्तर चाचणी प्रश्नावली.

1. कोरोना कालावधीत मुलांना ऑनलाईन/ऑफलाइन शिक्षण मिळाले आहे का? **होय/नाही.**

2. कोरोना कालावधीत तुम्ही मुलांचा घरी अभ्यास घेत आहात का? **होय/नाही.**

3. तुम्ही मुलांकडून डाळी निवडणे,शेंगा/लसुण सोलणे यासारख्या कृती करून घेतल्या आहेत का ? **होय/नाही.**

4. तुम्ही मुलांना आकाराची ओळख करून दिली आहे का ? **होय/नाही.**

5. तुम्ही मुलांकडून पाटीवर, जमिनीवर रेखाटन करून घेतले आहे का? **होय/नाही.**

6. तुम्ही मुलांकडून ठसेकाम, माती काम करून घेतले आहे का? **होय/नाही.**

7. तुम्ही मुलांना सरळ रेषेत /नागमोडी चालण्यास लावले आहे का? **होय/नाही.**

8. तुम्ही मुलांना स्पर्शाने कोणती वस्तू ओळखायला सांगितली आहे का? **होय/नाही.**

9. तुम्ही मुलांना आवाजावरून कोणती वस्तू ओळखायला सांगितली आहे का? **होय/नाही.**

10. मुले स्वतः विषयी माहिती सांगतात का? **होय/नाही.**

- **विद्यार्थी यादी -**

1 चेतन विजय घोलप

2. आदिलशा मोसीम फकीर

3. आदित्य रमेश घोलप

4. साक्षंत जालिंदर ढगे

5. अक्षय संदीप माने

6. कार्तिक संजय वायदंडे

7. सुहान कारकून्या पवार

8. सम्राट सुनिल सोनवणे

9. जैद जावेद चिखलकर

10. नजहत आरशद जमादार

11. कादंबरी सुनिल कांबळे

12. स्वरा दिपक वाघमारे

13. अनिसा शरीफ साठविलकर

14. राशी गणेश बागडे


15. श्रुती संजय घोलप

16. आरोही प्रीतम जाधव

17. अनन्या अनिल डोके

18.सोलीहा सलीम तांबोळी

- **पालक अभिप्राय –**



Date : / /
Page No.:


शैक्षणिक वर्ष २०२१ या वर्षामध्ये घेण्यात आलेल्या वर्गपूर्वतयारी उपक्रम अभ्यासात विद्यार्थ्यांमध्ये वैयक्तिक कौशल्य निर्माण करणे इयत्ता १ ली साठी १८ उपक्रम राबवण्यात आले. त्यात. लसून सोलणे, धान्य भरणे, चेंडू बनवणे. नागमोडी, चालणे, बोटांचे ठसे उमटविणे, आकार बनविणे, अशा अनेक प्रकारचे उपक्रम घेतले. त्याच उपक्रमातून खेळता-खेळता मुले अभ्यासात रमून गेली.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना चालना मिळाली. त्याच बरोबर विद्यार्थ्यांनी वेगवेगळी कौशल्ये आत्मसात केली. या उपक्रमाचा विद्यार्थ्यांना खुप फायदा झाला. अशा प्रकारचे उपक्रम शाळेमध्ये राबवावेत.

तसेच. निर्वाणे मॅडमांनी मुलांना खेळातून अभ्यासाची ओढ निर्माण करण्यासाठी खुप प्रयत्न केले. त्यांचे आम्ही सर्व पालकांपासून मनापासून आभार.

Ajamadar

सही



नमस्कार

जिल्हा परिषद शाळा न. ६० आष्टा


माझा मुलगा आदिलशा मोसीम फकीर इयत्ता १ली च्या वर्गात शिकत आहे. त्यांची वर्ग शिक्षिका निर्वाणे मॅडम यांनी ऑनलाईन द्वारे वेग-वेगळे उपक्रम घेतले त्या उपक्रमात त्यांनी मोजणे, डाळींपासून फुल तयार करणे, लसून सोलने अनेक प्रकारच्या डाळी वेगवेगळे करणे, फळे मोजणे इत्यादी उपक्रम मॅडमानी घेतले आणि आदिलशाने त्या उपक्रमात सहभागी होऊन पूर्ण केले त्या उपक्रमामुळे माझ्या मुलाची निरिक्षणक्षमतेत वाढ झाली आणि बुद्धी कौशल्यामध्ये चालना मिळाली लसून सोलने त्या उपक्रमामुळे माझ्या मुलामध्ये एकाग्रता निर्माण झाली खरच त्याचे मन स्थिर झाले. माझ्या मुलामध्ये भरपूर सुधार झाली खरच निर्वाणे मॅडमाचे हे उपक्रम कौतुकास्पद आहे. असेच उपक्रम प्रत्येक शाळेत शिक्षकाने राबवले पाहिजे आणि प्रत्येक शाळेला निर्वाणे मॅडमा सारखे शिक्षक हवे आहेत. शिकवण्याची पद्धत मनोरंजक आहे. त्यांचे आभार मानावे इतके थोडेच आहे.

दिनांक- १२.११.२०२२

Sh.Fakir

शाहीन मोसीम फकीर

- **गृहभेट नोंदवही**



**शिक्षक पालक भेट रजिस्टर**

वर्ग शिक्षकाचे नांव श्रीम. निर्वाणे राजश्री बाबुराव

इयत्ता पहिली तुकडी – माहे जून २०29


(प्रत्येक शिक्षकांनी दरमहा किमान पाच भेटी देणेच्या आहेत.)

| अ.नं. | दिनांक | विद्यार्थ्यांचे नांव | इयत्ता तुकडी | पालकांचे नांव | भेटीचे कारण-अभ्यास/गणवेश/गैरहजेरी/आरोग्य/इतर | समज मिळालेबद्दल पालकांची सही | वर्गशिक्षक सही | मुख्याध्यापक सही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | २/६ 2029 | आदिलशा मोसीम फकीर | 1 ली | शाहीन मोसीम फकीर | दाखलपात्र विद्यार्थी पालक भेट | Gmfakir. Gmfakir. | BUEvane | [signature] |
| 2. | ४/६ 2029 | कुजहत आरशद जमादार | 1 ली | नजराना आरशद जमादार | दाखलपात्र विद्यार्थी पालक भेट | HJamadar HJamadar | BUEvane | [signature] |
| 3. | ५/६ 2029 | कादंबरी सुनिल कांबळे | 1 ली | सुनिल कांबळे | दाखलपात्र विद्यार्थी पालक भेट | SKKumar SKKumar | BUEvane | [signature] |
| 4. | ६/६ 2029 | राशी गणेश बागडे | 1 ली | प्रियांका गणेश बागडे | ——— " ——— | P. G. B प्रि. ग. बागडे | BUEvane | [signature] |
| 5. | ५/६ 2029 | श्रुती संजय घोलप | 1 ली | प्रमिला संजय घोलप | ——— " ——— | प्रमिला संजय घोलप P.S.G. | BUEvane | [signature] |

- **कृतींचा तक्ता (पालकांसाठी)**

| अ.नं | कृतीचे नाव | दिनांक |
|---|---|---|
| 1 | डाळी निवडणे. | 15/06/2021 |
| 2 | लसूण सोलणे,शेंगा सोलणे. | 16/06/2021 |
| 3 | बाटलीचे टोपण काढणे/ लावणे, शर्टाची बटण काढणे /लावणे | 17/06/2021 |
| 4 | ओंजळीने पाणी धान्य भरणे. | 18/06/2021 |
| 5 | कागद,रुमाल,कापड इत्यादींच्या घड्या घालणे. | 19/06/2021 |
| 6 | कागद फाडून त्याचा चेंडू बनवणे. | 20/06/2021 |
| 7 | काढलेल्या आकारावर डाळी,बिया लावणे. | 21/06/2021 |
| 8 | भरलेला ग्लास घेऊन सरळ रेषेत/नागमोडी चालणे. | 22/06/2021 |
| 9 | चेंडू झेलणे, फेकणे,पकडणे. | 23/06/2021 |
| 10 | डोक्यावर वही/पुस्तक घेऊन चालणे. | 24/06/2021 |
| 11 | बोटांचे ठसे उमटविणे. भेंडी,कांदा,बटाटा ठसे उमटवणे. | 25/06/2021 |
| 12 | कापडाची वेणी घालणे. | 26/06/2021 |
| 13 | गोटया खेळणे/ लंगडी घालणे. | 27/06/2021 |
| 14 | खडे, चिंचोके घेऊन विविध रचना बनवणे. | 28/06/2021 |
| 15 | गादीवर कोलांट्या उड्या मारणे. | 29/06/2021 |
| 16 | स्पर्श ज्ञानाने वस्तू ओळखणे. | 30/06/2021 |
| 17 | डबीतील वस्तू आवाजावरून ओळखणे. | 1/07/2021 |
| 18 | विविध आकार ओळखता येणे. (गोल,त्रिकोण,चौकोन) | 2/07/2021 |
| 19 | धूळपाटीवर रेखाटन करणे | 3/07/2021 |
| 20 | मातीच्या विविध वस्तू बनविणे. | 4/07/2021 |
| 21 | स्व परिचय,मित्र परिचय,कुटुंब व आवडीबद्दल सांगणे. | 5/07/2021 |

- **पालकांसाठी दिलेल्या सूचनांची नोंदवही –**



दि. १५/०८/२०२

जिल्हा परिषद शाळा आष्टा नं. 17
ता. वाळवा जि. सांगली

इयत्ता - पहिली

कृती क्र. १ – डाळी निवडणे

उद्देश - ① मुलांमध्ये एकाग्रता वाढीस लावणे
② एका ठिकाणी बसण्याची सवय लागणे

पालकांनी मुलांना विविध डाळी एकत्र करून द्याव्यात कमीत कमी तीन ते चार प्रकारच्या डाळी द्याव्यात व त्यातून प्रत्येक डाळ वेगळी करण्यास सांगावे. यामुळे विद्यार्थ्यांचे हस्त - नेत्र कौशल्य विकसित होणार आहे. तसेच विद्यार्थ्यांची एकाग्रता, एका जागी बसण्याची क्षमता वाढीस लागणार आहे.

BBPawane
वर्गशिक्षिका
सही

मुख्याध्यापक
जि.प. शाळा नं. १७

जि.प.सांगली च्या शिक्षणविस्तार अधिकारी सौ. विमल माने मॅडम यांनी पहिल्याच दिवशी भेट देऊन नवोपक्रमाचे कौतुक केले.

- **आष्टा केंद्र समूहावर प्रसारण स्क्रीनशॉट –**

